॥ तीनी सांजा सखे मिळाल्या ॥

गायिकाः लता मंगेशकर
संगीतः हृदयनथ मंगेशकर
गीतः भा. रा. तांबे

तीनी सांजा सखे, मिळाल्या, देई वचन तुला
आजपासुनी जीवें अधिक तूं माझ्या हृदयाला ॥ धृ. ॥

कनकगोल ह मरीचिमाली जोडी जो सुयशा,
चक्रवाल हें पवित्र, ये जी शांत गभीर निशा,
त्रिलोकगामी मारुत, तैशा निर्मल दाहि दिशा -
साक्षी ऐसे अमर करुनि हे तव कर करिं धरिला ॥ १ ॥

स्वकरें तरुवर फुलें उधळिती, प्रीति-अक्षता या;
मंत्रपाठ हा झुळझुळु गातो निर्झर या कार्या;
मंगलाष्टकें गाति पांखरें मंजुळ या समया
सहस्त्रकर दिनकर हा स्वकरें उधळि गुलालाला ॥ २ ॥

नाद जसा वेणूंत, रस जसा सुंदर कवनांत,
गंध जसा सुमनांत, रस जसा बघ या द्राक्षांत,
पाणि जसें मोत्यांत, मनोहर वर्ण सुवर्णांत,
हृदयीं मी सांठवीं तुज तसा जीवित जों मजला ॥ ३ ॥